दै. श्रमिक एकजुट दि. 26/10/24

# नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन गुन्हे शोधपथकाकडुन गुन्ह्यातील तीन दुचाकी जप्त



नवीन नांदेड(प्रतिनिधी)- नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे उपनिरीक्षक महेश कोरे यांच्या पथकाने गुन्ह्यातील अज्ञात आरोपीचा शोध घेत तीन दुचाकी जप्त केल्या आहेत.

अबीनाश कुमार जिल्हा पोलीस अधिक्षक नांदेड व अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव पोलीस उपविभागीय अधिकारी इतवारा नांदेड सुशिल कुमार नायक यांनी ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत मोटार सायकल चोरीचे दाखल असलेले गुन्हे उघड करण्याचे सर्व पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना आदेश दिले होते,त्या अनुषंगाने पो. स्टे. नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे महेश कोरे पोलीस उप निरीक्षक व सतार शेख,संतोष जाधव,विक्रम वाकडे,शंकर नलबे, माधव माने,शंकर माळगे, ज्ञानेश्वर कलंदर, मारोती पंचलीगं ,आसिफ शेख ,सुनिल गटलेवार, शिवानंद तेजबंद,पथकाने गुन्हयातील अज्ञात आरोपीचा व चोरीस गेलेल्या मोटार सायकलचा शोध घेत असताना माहीतगार यांचे मदतीने यातील सुजल सर्जेराव देशमुख,रा.मिरखेल, जिल्हा परभणी, मुकुंद गगाधर कोरे रा.पांढरगाव हा.मु.खंडोबा बाजार परभणी, कृष्णा मारोती परघणे रा. तरोडा ता.जि.परभणी आरोपीतांना ताब्यात घेवुन चौकशी केली.

असता यातील आरोपीतांनी गुन्हयाची कबुली देवुन चोरी केलेल्या वरील वर्णनाच्या दोन बजाज पल्सर मोटार सायकल, एक हांडा स्प्लेनडर मोटार सायकल एकुण किमती १,६०,०००/- रुपये काढुन दिल्याने त्या जप्त करुन ताब्यात घेतल्या आहेत व आरोपींना ताब्यात घेतले आहे.सदर गुन्हयाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ गवळी हे करीत आहेत.